MHKO030113122024

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | - | ३०/०७/२०२४. |
| नोंदणी दिनांक | - | ०३/०८/२०२४. |
| निकाल दिनांक | - | ०५/०५/२०२६. |
| कालावधी | - | वर्षे महिना दिवस. |
| | | **०१ ०९ ०४.** |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१४ कोल्हापूर यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी: शिल्पा वि. कुलकर्णी),**

**संं.फौ.ख.क्र.९३९९/२०२४.** **निशाणी क्रमांक १९/ब.**

**गु.र.क्र.१७३/२०२४.**

**दोषारोप** – भा.दं.वि.सं.कलम २७९ प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>**गांधीनगर पो.ठा., कोल्हापुर.** |
| अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता | | श्री.एस.जे.सरनोबत. |
| **आरोपी** | | **इस्माईल चिन्नू मुजावर,**<br>व.व.३९, धंदा - मजुरी,<br>रा.गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | श्री.एन.एस.चौगुले. |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | | १९/०४/२०२४. |
| गुन्हा दाखल दिनांक | | १९/०४/२०२४. |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | | ३०/०७/२०२४. |
| दोषारोप ठेवलेचा दिनांक | | २०/०८/२०२५. |
| पहिला साक्षीदार तपासल्याचा दिनांक | | १०/०३/२०२६. |

| | | |
|---|---|---|
| साक्षी पुरावा बंद केल्याचा दिनांक | | १६/०४/२०२६. |
| युक्तिवाद दिनांक | | ०५/०५/२०२६. |
| न्यायनिर्णय दिनांक | | ०५/०५/२०२६. |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | | अंतिम आदेशाप्रमाणे |

## आरोपीची माहिती

| अ. क्र. | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपातील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | भा.ना.सु.सं.कलम ४६८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | इस्माईल मुजावर | ४१-अ प्रमाणे नोटीस. | -- | भा.दं.वि.सं.कलम २७९ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | --- | --- |

## अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्रमांक | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१ | रोहन रमेश चौगुले | ०८ | फिर्यादी. |
| ०२ | सचिन सखाराम सावंत | १२ | पंच. |
| ०३ | राजेश शंकर नाईक | १४ | तपासणी अधिकारी. |

## अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेले दस्तऐवज

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| ०१. | ०९ | फिर्याद. |
| ०२. | १० | प्रथम खबर अहवाल. |
| ०३. | १३ | पंचनामा. |
| ०४. | १५ | लेखी आदेश. |
| ०५. | १६ | ४१-अ प्रमाणे नोटीस. |

# न्या य नि र्ण य

**(घोषित दि.०५ मे, २०२६ रोजी.)**

आरोपीविरुध्द भा.दं.वि.सं.कलम २७९ अन्वये आरोप ठेवून सदरचा खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन**

**०२.** दि.१९/०४/२०२४ रोजी १८.२० वा.चे सुमारास गांधीनगर येथील सिंधू मार्केटसमोर रोडवर गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील सी.बी.झेड.मोटर सायकल क्र.एम.एच.०९ बी.एस.४७८६ ही दुचाकी भरधाव वेगाने, हयगयीने, बेदरकारपणे, निष्काळजीपणे, अविचाराने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालविली. त्यामुळे फिर्यादी यांनी आरोपीविरूध्द फिर्याद दिली. दाखल केलेल्या फिर्यादीवरुन गांधीनगर पो.ठा. येथे गु.र.क्र.१७३/२०२४ नोंदवण्यात आला. त्यानंतर तपास तपासणी पो.हे.कॉ.श्री.आर.एस.नाईक यांच्याकडे सुपुर्त केला. त्यांनी सखोल चौकशी केली, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, पंचनामा करून तपासाअंती आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०३.** आरोपी हजर झाल्यानंतर आरोपीवर भा.दं.वि.सं.कलम २७९ प्रमाणे प्रतिकथन नि.क्र.०६ लगत नोंदविले. आरोपीस प्रतिकथन त्यांचे भाषेत वाचून आणि समजावून सांगणेत आले असता त्यांनी निवेदनाप्रमाणे ते नाकारुन प्रकरण चालविण्याची विनंती केली. आरोपीचे भा.ना.सु.संहिता कलम ३५१ नुसार निवेदन नि.क्र.१८ ला नोंदविण्यात आले.

**०४.** अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता व आरोपीच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण पुरावा व दोन्ही बाजुचा युक्तीवाद पाहता खटल्याच्या

निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित झाले. त्या प्रत्येक मुद्यावर कारणांसहीत उत्तरे खालीलप्रमाणेः-

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, दि.१९/०४/२०२४ रोजी १८.२० वा.चे सुमारास गांधीनगर येथील सिंधू मार्केट - समोर रोडवर गांधीनगर, ता.करवीर, जि.कोल्हापूर येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील सी.बी.झेड.मोटर सायकल क्र. एम.एच.०९ बी.एस.४७८६ ही दुचाकी हयगयीने, निष्काळजीपणे व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालविले जेणेकरुन मानवी जीवन धोक्यात येईल किंवा कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोहोचेल ? | **नकारार्थी.** |
| ०२. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक ०१ व ०२ करिता**

**०५.** आरोपीवर असलेले दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने एकूण तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे.

**०६.** साक्षीदार क्र.०१ रोहन रमेश चौगुले (फिर्यादी) यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, दि.१९/०४/२०२४ रोजी ते गांधीनगर पो.ठा. येथे पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत असताना त्यांचे वरिष्ठ पो.नि. यांचा स.पो.नि.दिपक जाधव यांना मेसेज आला की, निष्काळजीपणे भरधाव वेगाने वाहन चालविणा-यांवर कारवाई करा. त्याप्रमाणे स.पो.नि.जाधव यांनी त्यांना, पो.स.इ.शिरगीरे, पो.कॉ.ठोंबरे व कांबळे यांना

पेट्रोलिंगचे आदेश दिले. चिंचवाड ते तावडे हॉटेल रोडवर ते पेट्रालिंग करत होते. सिंधु मार्केट कमानीजवळ आल्यानंतर एक इसम त्याच्या ताब्यातील सी.बी.झेड.एम.एच. ०९ बी.एस. ४७८६ हे वाहन भरधाव वेगाने चालवत असल्याचे दिसून आला. त्याला त्यांनी हात करुन बाजुला थांबवले. त्यानंतर सावंत यांनी पंच बोलावून घेतले. आरोपीला नाव विचारले असता त्याने त्याचे नाव इस्माईल चिनु मुजावर सांगितले. त्यांनी आरोपीविरुध्द फिर्याद (नि.क्र.०९) दिली.

**०७.** सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला असता त्यानी त्याच्या उलट - तपासामध्ये मान्य केले की, बिनतारी संदेशाची नोंद स्टेशन डायरीमध्ये केली परंतु त्याचा क्रमांक त्यांना आठवत नाही. चिंचवाड ते तावडे हॉटेल हा रस्ता वर्दळीचा आहे.

**०८.** साक्षीदार क्र.०२ सचिन सखाराम सावंत (साक्षीदार) यांच्या साक्षीत असे आले की, दि.१९/०४/२०२४ रोजी ते गांधीनगर पोलीस ठाणे येथे पो. हे.कॉ. या पदावर कार्यरत असताना त्यांचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांचा स.पो.नि.दिपक जाधव यांना मेसेज आला की, निष्काळजीपणे वाहन चालविणा-यांवर कारवाई करा. स.पो.नि.जाधव यांनी त्यांना, पो.स.इ.शिरगीरे, पो.कॉ.ठोंबरे, चौगले व कांबळे यांना पेट्रोलिंगचे आदेश दिले. चिंचवाड ते तावडे हॉटेल रोडवर ते पेट्रालिंग करत होते. सिंधु मार्केट कमानीजवळ आल्यानंतर एक इसम त्याच्या ताब्यातील सी. बी.झेड.एम. एच. ०९ बी.एस.४७८६ हे वाहन भरधाव वेगाने चालवत असल्याचे दिसून आला. त्याला त्यांनी हात करुन बाजुला थांबवले. त्यानंतर हवालदार सावंत यांनी दोन पंच बोलावून घेतले. आरोपीला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव इस्माईल चिनु मुजावर असे सांगितले. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा (नि.क्र.१३) केला. पंचनाम्यावर दोन पंचाची व त्यांची सही आहे.

**०९.** सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला असता त्यानी त्याच्या उलट-

तपासामध्ये मान्य केले आहे की, पेट्रोलिंग करीता ते संध्या.०६.०० वाजता बाहेर पडले. चिंचवाड ते गांधीनगर हा वर्दळीचा रस्ता आहे.

**१०.** साक्षीदार क्र.०३ राजेश शंकर नाईक (तपासणी अधिकारी) यांच्या साक्षीमध्ये असे आले की, दि.१९/०४/२०२४ रोजी ते गांधीनगर पो.ठा.येथे पोलीस हेड कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत असताना त्यांचे वरिष्ठ ए.पी.आय. श्री.जाधव यांनी पोलीस अधिक्षक कार्यालयातुन गांधीनगरच्या हद्दीत रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन वाहन चालवणा-यांवर कारवाईचे आदेश दिले. श्री.जाधव यांनी पो.स.ई.श्री. शिरगीरे, पो.कॉ.ठोंबरे, पो.कॉ.कांबळे यांना कारवाईकरीता रवाना केले. वरिल सर्व गांधीनगर ते चिंचवाड जाणा-या रोडवर सिंधु मार्केटसमोर कारवाईकरीता थांबले असता समोरुन एक इसम सी.बी.झेड क्र.एम.एच.०९ बी.एस.४७८६ वरुन भरधाव वेगाने आला. त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव इस्माईल चिन्नु मुजावर असे सांगितले. पोलीस हवालदार सावंत यांनी पंचनामा केला. पो.कॉ.रोहन चौगुले यांनी फिर्याद दिली. त्याप्रमाणे गु.र.क्र.१७३/२०२४ नोंदवुन त्याचा तपास लेखी आदेशाने (नि.क्र.१५) त्यांच्याकडे देण्यात आला. लेखी आदेशावर श्री.जाधव यांची सही आहे. आरोपीला फौ.प्र.सं.कलम ४१अ प्रमाणे नोटीस (नि.क्र.१६) दिली. साक्षीदाराचे तपास टिपण नोंदविले. आरोपीचे आधार कार्ड व पॅन कार्ड प्राप्त करुन कामात सामीत केले. तपासाअंती आरोपी इस्माईल मुजावर याने त्याच्या ताब्यातील सी.बी.झेड क्र.एम. एच.०९ बी.एस.४७८६ हे वाहन हयगयीने, अविचाराने, निष्काळजीपणे, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालविले असे निष्पन्न झाल्याने त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात पाठविले.

**११.** सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला असता त्यानी त्याच्या उलट - तपासामध्ये मान्य केले आहे की, घटनेदिवशी पेट्रोलिंग डयुटी असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा या कामी सामील नाही. घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण आहे परंतु

वाहने सावकाश चालवत नाहीत.

**१२.** एकंदरीत अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या दोन्ही साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपीविरुध्द फिर्यादीचे अनुषंगाने कोणताही सबळ पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. सदर कामी इतर कोणताही स्वतंत्र पंच व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासलेला नाही. एकंदरीत अभियोग पक्षाच्या पुराव्यावरुन घटनेबाबत संशय निर्माण होतो व त्यावरुन आरोपीविरुध्द कोणताही दोषारोप निःसंशयरित्या सिध्द होत नाही. अभियोग पक्षास पूरेशी संधी देवूनही इतर साक्षीदारांना साक्षीकामी हजेर ठेवू शकला नाही. सदर प्रकरणात घटनास्थळावरील कोणताही परिस्थितीजन्य पूरावा अभिलेखावर आलेला नाही. सबब, आरोपीने त्याच्या ताब्यातील सी.बी.झेड.मोटर सायकल क्र.एम.एच.०९ बी.एस.४७८६ ही दुचाकी भरधाव वेगाने, हयगयीने, बेदरकारपणे, निष्काळजीपणे, अविचाराने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालविली ही बाब सिध्द होत नसून अभियोग पक्षातर्फे दाखल करण्यात आलेल्या केसवर संशय निर्माण होतो. न्यायतर्क शास्त्रानुसार फौजदारी प्रकरणात संशयाच्या फायदा हा आरोपीपक्षास जातो. सदर कामी आलेला पुरावा हा संशयी स्वरुपाचा वाटतो. त्यामुळे त्याचा फायदा आरोपीस देवून त्याला निर्दोष मुक्त करणे न्यायाचे दिसते. करिता मुद्दा क्र.०१ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.०२ करिता खालील आदेश पारित करणेत येत आहेः-

## आ दे श

**०१.** आरोपी इस्माईल चिन्नू मुजावर यास भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७१(१) अन्वये भारतीय दंड विधान संहिता कलम २७९ प्रमाणे गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करणेत येत आहे.

**०२.** आरोपीचे वैयक्तीक व जामीन बंधपत्र रद्द करणेत येत आहे तसेच आरोपीस देखील मुक्त करण्यात येते.

**०३.** आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ प्रमाणे रक्कम रू.१५,०००/- चा वैयक्तीक जातमुचलका द्यावा.

*(सदर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित.)*

Digitally signed by SHILPA VISHVESH KULKARNI
Date: 2026.05.05 13:43:15 +0530

( शिल्पा वि. कुलकर्णी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१४, कोल्हापूर.

दि.०५/०५/२०२६.